अध्यक्ष महाविद्यालय
क्र. 03
19/11/05
नागपूर

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

क्र.म.वि./ 1739,018635
दिनांक 16 नोव्हेंबर, 2005.

प्रति,

अध्यक्ष/सचिव,
अजय बहुउद्येशिय सेवा मंडळ,
द्वारा:—सुयश शिक्षण महाविद्यालय,
वैभवनगर नरसाळा रोड,दिघोरी उमरेड रोड,नागपूर.

**विषय** :— सत्र 2005—2006 पासून शिक्षण विद्याशाखेचे नविन अध्यापक (बी.एड्.) महाविद्यालय सुरू करण्याबाबत.

**संदर्भ** :— शासन पत्र क्र. एनजीसी/ 2005/(510/05) मशि—3, दि. 6 ऑगस्ट, 2005.

महोदय,

उपरोक्त संदर्भित पत्रानुसार आपल्या संस्थेला राज्य शासनाने सत्र 2005—2006 पासून शिक्षण विद्याशाखेचे नविन अध्यापक (बी.एड्.) महाविद्यालय सुरू करण्यास दिलेल्या परवानगी नुसार व स्थानिय चौकशी समितीच्या शिफारशी नुसार विद्वत परिषदच्या वतीने मा.कुलगुरुंनी म.वि.अधिनियम 1994 च्या कलम 14(7) अंतर्गत खालील प्रमाणे सत्र 2005—06 पासून प्रथम संलग्निकरण प्रदान करण्यास मान्यता दिली आहे.

| संस्थेचे नाव | महाविद्यालयाचे नाव व ठिकाण | शाखा/विषय | विद्यार्थी संख्येचे निकष |
|---|---|---|---|
| अजय बहुउद्येशिय सेवा मंडळ नागपूर | सुयश शिक्षण महाविद्यालय वैभवनगर नरसाळा रोड, दिघोरी उमरेड रोड,नागपूर | शिक्षण विद्या शाखा, | 100विद्यार्थी (मराठी, माध्यम) |

**उपरोक्त प्रथम संलग्निकरण खालील अटींच्या अधिन राहून देण्यात आलेले आहे.**

1) सदर महाविद्यालयास दिलेली मान्यता ही कायम विना अनुदान तत्वावर असून या महाविद्यालयास भविष्यात कोणत्याही प्रकारचे अनुदान किंवा आर्थिक मदत शासनाकडून देण्यात येणार नाही.
2) या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या आर्थिक बाबीसंबंधी सर्वस्वी जबाबदारी स्विकारणे संस्थेवर बंधनकारक आहे.
3) कायम विना अनुदान तत्वावर संस्थेस महाविद्यालय आर्थिकदृष्टया चालविणे शक्य व्हावे, यासाठी संस्थेने विद्यार्थाकडून किती शुल्क आकारावे हे विद्यापीठाकडून ठरवून घ्यावे.
4) महाविद्यालयाला प्रथम संलग्निकरण स्थानीय चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालात घातलेल्या अटी पुर्ण करण्याच्या अटीवर देण्यात आलेले आहे. ( समितीचा अहवालाची प्रत सोबत जोडलेली आहे.)
5) सदर अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या प्रवेश नियमानुसार करण्यांत येईल.

कृपया कळावे.

आपला,

सहायक कुलसचिव (म.वि.)